# सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला

## पदवी व पदव्युत्तर समाजशास्त्र विभाग

### विभागाव्दारे आयोजित वर्षनिहाय कार्यक्रम

## Year Wise Departmental Activities

### सत्र : २०१७—२०१८

**१) समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे उदघाटन:—**

समाजशास्त्र विभागात दि.१५ सप्टेंबर २०१७ रोजी समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटक व वक्ते म्हणून श्री.धाबेकर कला महाविद्यालय, खंडकी अकोला येथील समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा.अमरिष गावंडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष विभागप्रमुख डॉ.दिनकर उंबरकर तर प्रमुख अतिथी म्हणून राज्यशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ.रतन राठोड उपस्थित होते.

याप्रसंगी समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणून कु.शुभांगी दामोदर व सचिव म्हणून विनोद देवकर यांची निवड करण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी समाजशास्त्र अभ्यास मंडळाच्या कार्यपध्दतीबद्दल व विद्यार्थ्यांना भविष्यात येणाऱ्या आव्हानांबद्दल मार्गदर्शन केले.

**२) चर्चासत्र व उद्बोधन वर्गाचे आयोजन:—**

समाजशास्त्र विभागांतर्गत दि.१९ जानेवारी २०१८ रोजी 'समाजशास्त्र:— एक सामाजिक विज्ञान' या विषयावर पदवी व पदव्युत्तर समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांसाठी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री भाऊसाहेब लहाने महाविद्यालय पिंजर येथील समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा.डॉ.अनिल ठाकरे उपस्थित होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ.दिनकर उंबरकर उपस्थित होते. यावेळी पदव्युत्तर समाजशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी शोध निबंधांचे वाचन केले तसेच उपस्थित विद्यार्थ्यांना चर्चासत्राचे अध्यक्ष डॉ.दिनकर उंबरकर व प्रमुख मार्गदर्शक प्रा. डॉ.अनिल ठाकरे यांनी मार्गदर्शन केले.

३)  वर्गामध्ये आयोजित गट चर्चा व चर्चासत्र:—

अ.  विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी बी.ए.भाग—३ च्या विद्यार्थ्यांसाठी दि. ०१/०९/२०१७ रोजी ''सामाजिक मानवशास्त्राचे भारताच्या संदर्भात महत्व'' या विषयावर गट चर्चा आयोजित करण्यात आली. या गट चर्चेमध्ये एकूण ११ विद्यार्थी सहभागी झाले होते.

ब.  बी.ए.भाग—१ च्या विद्यार्थ्यांसाठी दि.०७/०९/२०१७ रोजी 'समाजशास्त्राची व्यवहारोपयोगी'' या विषयावर गट चर्चा आयोजित करण्यात आली. या गट चर्चेमध्ये एकूण १५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

क.  एम.ए.भाग—१ च्या विद्यार्थ्यांसाठी दि.०५/१०/२०१७ रोजी 'ग्रामीण स्थलांतरणाची कारणमिमांसा' या विषयावर चर्चासत्र आयोजित केले होते. या चर्चा सत्रामध्ये एकूण २० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

ड.  बी.ए.भाग—२ च्या विद्यार्थ्यांकरीता दि.२१/१२/२०१७ रोजी 'शेतकरी आत्महत्या कार्यकारणभाव'' या विषयावर चर्चासत्र आयोजित केले होते यामध्ये एकूण १० विद्यार्थी सहभागी झाले होते तसेच एम.ए.भाग—१ च्या विद्यार्थ्यांकरीता 'शेतकरी आत्महत्या कार्यकारणभाव'' या विषयावर चर्चासत्र आयोजित केले यामध्ये एकूण १२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

४) अभ्यास दौऱ्याचे आयोजन:—

अ.  दि.०५/१०/२०१७ रोजी बाल निरीक्षण गृहात राहणाऱ्या अल्पवयीन गुन्हेगारांच्या समस्या जाणून घेण्यासाठी विभागप्रमुख डॉ.दिनकर उंबरकर यांच्या मार्गदर्शनात शासकीय बाल निरीक्षणगृहाला पदवी व पदव्युत्तर समाजशास्त्र विभागातील विद्यार्थी व प्राध्यापकांनी भेट दिली. बाल निरीक्षणगृहात राहणाऱ्या अल्पवयीन मुलांच्या समस्या व परिस्थिती जाणून घेतली व तथ्य संकलनाद्वारे माहिती गोळा करुन आपला अहवाल विभागात सादर केला.

ब.  दि.१०/१२/२०१७ रोजी वृध्दांच्या समस्या जाणून घेण्यासाठी विभागप्रमुख डॉ. दिनकर उंबरकर यांच्या मार्गदर्शनात मातोश्री वृध्दाश्रम खडकी (अकोला) येथे पदवी व पदव्युत्तर समाजशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनी भेट दिली व त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.

क.	समाजशास्त्र विभागांतर्गत येणाऱ्या पर्यावरण शिक्षण विभागाचा अभ्यास दौरा दि. २५/१२/२०१७ रोजी विभागप्रमुख डॉ.दिनकर उंबरकर यांच्या मार्गदर्शनात व प्रा.योगेश कराळे यांच्या आयोजनात चिखलदरा, मुक्तागिरी, मेळघाट येथे संपन्न झाला.

ड.	दि.०९ आणि १० फेब्रुवारी २०१८ रोजी विभागप्रमुख डॉ.दिनकर उंबरकर यांच्या मार्गदर्शनात व प्रा.दिलीप कुमरे यांच्या आयोजनात वेरुळ, दौलताबाद, जायकवाडी व औरंगाबाद तसेच दि.२८/०२/२०१८ रोजी लोणार सरोवर व सिंदखेड राजा येथे आयोजित करण्यात आला.

ऐतिहासिक, पर्यावरणीय, सामाजिक व सांस्कृतिक उद्देशपूर्तीच्या उद्देशाने आयोजित या अभ्यास दौऱ्यामध्ये विद्यार्थ्यांनी तथ्य संकलन करुन आपला अहवाल अभ्यास दौऱ्यानंतर विभागात सादर केला.

**५)	संशोधन क्षेत्रातील योगदानः—**

सत्र २०१७—२०१८ या शैक्षणिक सत्रात विभागप्रमुख डॉ.दिनकर उंबरकर यांच्या मार्गदर्शनात ०४ विद्यार्थ्यांनी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची पीएच.डी.(आचार्य) पदवी प्राप्त केली.

विभागप्रमुख डॉ.दिनकर उंबरकर यांनी NAAC चे Co-ordinator पद यशास्वीरित्या सांभाळून महाविद्यालयाला ‘A’ मानांकन प्राप्त करुन देण्यात मोलाची भूमिका बजावली.

या शैक्षणिक सत्रात विभागप्रमुख दिनकर उंबरकर यांनी बॅकॉक येथे आयोजित आंतरराष्ट्रीय चर्चासत्रामध्ये सहभागी होवून शोध निबंधाचे वाचन केले. या प्रसंगी त्यांना Distinguished Research Award प्रदान करण्यात आला.

या शैक्षणिक सत्रात विभागप्रमुख डॉ.दिनकर उंबरकर यांनी आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये ०९ शोधनिबंध, राष्ट्रीय जर्नल्समध्ये ०५ शोध निबंध प्रकाशित केले आणि ते समाजशास्त्र विषयाच्या ०२ कार्यशाळांमध्ये सहभागी झाले.

सत्र २०१७—१८ या शैक्षणिक सत्रात विभागातील प्रा.सुनिल गायगोळ यांनी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला सामाजिक शास्त्रांतर्गत दिल्या जाणाऱ्या पीएच.डी. (आचार्य) पदवीसाठी शोध प्रबंध सादर केला.

या शैक्षणिक सत्रात विभागातील प्रा. सुनिल गायगोळ यांना यु.जी.सी. च्या लघु शोध प्रकल्पाची (MRP) मान्यता मिळाली.

या शैक्षणिक सत्रात प्रा.सुनिल गायगोळ यांनी आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये ०५ शोध निबंध प्रकाशित केले व समाजशास्त्र विषयाच्या ०२ कार्यशाळांमध्ये सहभाग घेतला.

सत्र २०१७—१८ या शैक्षणिक सत्रात विभागातील प्रा.दिलीप कुमरे यांनी आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये ०५ शोध निबंध प्रकाशित केले व त्यांनी समाजशास्त्र विषयाच्या ०२ कार्यशाळांमध्ये सहभाग घेतला.

## सत्र — २०१८—२०१९

**१) समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्‌घाटनः—**

समाजशास्त्र विभागात दि. १३/०९/२०१८ रोजी समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्‌घाटन करण्यात आले कार्यक्रमाचे उद्‌घाटक व वक्ते म्हणून श्री. भाऊसाहेब लहाने महाविद्यालय, पिंजर येथील समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. अनिल ठाकरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष विभागप्रमुख डॉ. दिनकर उंबरकर तर प्रमुख अतिथी म्हणून राज्यशास्त्र विभागाचे डॉ. बाळासाहेब जोगदंड उपस्थित होते.

या प्रसंगी समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणून कु.पल्लवी टिकार एम.ए. भाग—२ व सचिव म्हणून कु.पल्लवी काळंके एम.ए.भाग—१ यांची निवड करण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी समाजशास्त्र अभ्यास मंडळाची कार्यपध्दती व विविध आव्हाने यांच्याविषयी मार्गदर्शन केले.

**२) चर्चासत्र व उद्‌बोधन वर्गाचे आयोजनः—**

समाजशास्त्र विभागांतर्गत दि.०७/०१/२०१९ रोजी 'शेतकरी आत्महत्या नियंत्रणात शासकीय—गैरशासकीय संस्थांचे योगदान' या विषयावर पदवी व पदव्युत्तर समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांसाठी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री धाबेकर महाविद्यालय खडकी, (अकोला) येथील समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा.अमरिष गावंडे उपस्थित होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ.दिनकर उंबरकर उपस्थित होते. याप्रसंगी पदवी व पदव्युत्तर समाजशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी शोध निबंधांचे वाचन केले. तसेच उपस्थित विद्यार्थ्यांना चर्चासत्राचे अध्यक्ष डॉ.दिनकर उंबरकर आणि प्रमुख मार्गदर्शक प्रा. अमरिष गावंडे यांनी मार्गदर्शन केले.

**३) वर्गामध्ये आयोजित गट चर्चा व चर्चासत्रः—**

अ. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी बी.ए.भाग—१ च्या विद्यार्थ्यांकरीता 'सामाजिक दर्जाचे मानवी जीवनातील महत्व' या विषयावर गट चर्चा दि.११/१०/२०१८ रोजी आयोजित करण्यात आली. सदर गट चर्चेमध्ये ३५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

ब. दि.०३/०९/२०१८ रोजी बी.ए.भाग—१,२ व ३ च्या विद्यार्थ्यांकरीता 'समाजशास्त्राचे दैनंदिन जीवनातील योगदान' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. यामध्ये एकूण ३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

क. दि.२८/१२/२०१८ रोजी बी.ए.भाग—२ व एम.ए.भाग—१ च्या विद्यार्थ्यांकरीता 'ग्रामीण जातीव्यवस्थेचे बदलते स्वरुप' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये बी.ए.भाग—२ चे २५ व एम.ए.भाग—१ चे २५ असे एकूण ५० विद्यार्थी सहभागी झाले.

**४) अभ्यास दौऱ्याचे आयोजनः—**

दि.२३ व २४ डिसेंबर २०१८ रोजी मौजा औरंगाबाद, वेरुळ व अजिंठा येथे दि.२२ व २४ फेब्रुवारी २०१९ रोजी विभागातील सहायक प्राध्यापक श्री. दिलीप दामु कुमरे यांच्या आयोजनात व विभागप्रमुख डॉ.दिनकर उंबरकर यांच्या मार्गदर्शनात मौजा पारडसिंगा (काटोल), दीक्षाभूमि (नागपूर), ड्रॅगन पॅलेस (कामठी) श्री रामतीर्थ क्षेत्र (रामटेक) येथे ऐतिहासिक, पर्यावरणीय व सामाजिक, सांस्कृतिक अध्ययनाचे दृष्टीने अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले.

या अभ्यास दौऱ्यात विद्यार्थ्यांनी तथ्यांचे संकलन करुन आपला अहवाल समाजशास्त्र विभागात सादर केला.

**५) गुणवत्ता यादी व गुणवंत विद्यार्थी :—**

दरवर्षी प्रमाणे याही सत्रात विभागातील कु. जयश्री पंजाबराव काळे हिने सं.गा.बा. अमरावती विद्यापीठाच्या उन्हाळी २०१८ च्या वार्षिक परिक्षेत विद्यापीठातून समाजशास्त्र विषयाच्या गुणवत्ता यादीत अनुक्रमे ०५ स्थान प्राप्त केले.

**६) शैक्षणिक परिषदेवर नियुक्ती :—**

विभागप्रमुख डॉ. दिनकर उंबरकर यांची सं. गा. बा. अमरावती विद्यापीठाच्या समाजशास्त्र अभ्यास मंडळावर कुलगुरुद्वारा नामनिर्देशित सदस्य म्हणून निवड झाली.

तसेच विभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. सुनिल गायगोळ यांची सुध्दा सं. गा. बा. अमरावती विद्यापीठाच्या समाजशास्त्र अभ्यास मंडळावर कुलगुरुद्वारा नॉन हेड प्रवर्गातुन नामनिर्देशित सदस्य म्हणून निवड झाली.

७) **संशोधन क्षेत्रातील योगदान :—**

विभागातील डॉ. सुनिल प्रल्हाद गायगोळ यांनी 'अकोला जिल्हयातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या : एक समाजशास्त्रीय अध्ययन' या विषयावर शोध प्रबंध सादर करुन सं.गा.बा. अमरावती विद्यापीठाची आचार्य पदवी (पीएच.डी.) प्राप्त केली.

सत्र २०१८—१९ मध्ये महाविद्यालयाला सं. गा. बा. अमरावती विद्यापीठा अंतर्गत मानव्ये व समाज विज्ञान शाखेमध्ये 'समाजशास्त्र' विषयात आचार्य पदवीकरिता संशोधन केंद्राची मान्यता मिळाली. या संशोधन केंद्रात विभाग प्रमुख डॉ. दिनकर उंबरकर व डॉ. सुनिल प्रल्हाद गायगोळ यांना आचार्य पदवीचे मार्गदर्शक म्हणून मान्यता मिळाली.

या शैक्षणिक सत्रात विभागप्रमुख डॉ. दिनकर उंबरकर यांनी यु.जी.सी. मान्यता प्राप्त आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय जर्नल्समध्ये ०९ शोध निबंध प्रकाशित केले व ०२ कार्यशाळांमध्ये सहभागी झाले.

विभागातील सहायक प्राध्यापक डॉ. सुनिल गायगोळ यांनी या शैक्षणिक सत्रात यु. जी.सी. मान्यता प्राप्त आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय जर्नल्समध्ये ०७ शोध निबंध प्रकाशित केले व ०२ कार्यशाळांमध्ये सहभागी झाले.

विभागातील सहाय्यक प्राध्यापक श्री. दिलीप दामु कुमरे यांनी या शैक्षणिक सत्रात यु.जी.सी.मान्यता प्राप्त आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय जर्नल्समध्ये ०७ शोध निबंध प्रकाशित केले व ०२ कार्यशाळांमध्ये सहभागी झाले.

## सत्र — २०१९—२०२०

**१)  समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटनः—**

विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी दरवर्षीप्रमाणे या सत्रात दि. १२/०९/२०१९ रोजी पदवी व पदव्युत्तर समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटक व वक्ते म्हणून श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय, खडकी, अकोला येथील प्रा. डॉ.बळीराम अवचार उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष विभागप्रमुख डॉ.दिनकर उंबरकर तर प्रमुख अतिथी म्हणून इंग्रजी विभागप्रमुख डॉ.आर.आर.रणपिसे उपस्थित होते.

याप्रसंगी समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणून कु. आरती पाचपोर एम.ए. भाग—१ व सचिव म्हणून लखन तिवारी एम.ए.भाग—२ यांची निवड करण्यात आली. उपस्थित सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या भविष्यकालीन प्रगतीसाठी समाजशास्त्र अभ्यास मंडळाची असणारी आवश्यकता, विद्यार्थ्यांचा विविध कार्यक्रमातील सहभाग, विद्यार्थ्यांसमोरील विविध आव्हाने आणि या मंडळाच्या यशस्वीतेसाठी आवश्यक असणाऱ्या रणनितीबद्दल मार्गदर्शन केले.

**२)  चर्चासत्र व उद्बोधन वर्गाचे आयोजनः—**

विभागांतर्गत दि.०९/०१/२०२० रोजी ‘‘आधुनिक जीवन पध्दतीची समाजापुढील आव्हाने: कारणे व उपाय’’ या विषयावर पदवी व पदव्युत्तर समाजशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री. धाबेकर कला महाविद्यालय, खडकी, अकोला येथील समाजशास्त्र विभागप्रमुख, प्रा.अमरिष गावंडे उपस्थित होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ.दिनकर उंबरकर उपस्थित होते. या चर्चासत्रात अनेक पदवी व पदव्युत्तर समाजशास्त्र विद्यार्थ्यांनी आपल्या शोध निबंधाचे वाचन केले. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या शोध निबंधाचे मूल्यमापन आणि विश्लेषण करुन विद्यार्थ्यांना भावी आयुष्याच्या वाटचालीकरीता यथोचित असे बहुमूल्य मार्गदर्शन केले.

३) **वर्गामध्ये आयोजित गट चर्चा व चर्चासत्रः—**

अ. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी दि.०७/१०/२०१९ रोजी बी.ए.भाग—१ व २ च्या विद्यार्थ्यांकरीता ‘सामाजिक नियंत्रणाचे समाजातील योगदान’ या विषयावर चर्चासत्र करण्यात आले यामध्ये एकूण २२ विद्यार्थी सहभागी झाले.

ब. दि.१३/०२/२०२० रोजी बी.ए.भाग—१ व एम.ए.भाग—१ च्या विद्यार्थ्यांकरीता ‘कुटूंब संस्थेचे भवितव्य’ या विषयावर गट चर्चेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये एकूण १८ विद्यार्थी सहभागी झाले.

क. दि.१५/०२/२०२० रोजी बी.ए.भाग—३ व बी.ए.भाग—२ च्या विद्यार्थ्यांकरीता ‘विवाहाचे बदलते स्वरुप’ या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. यामध्ये एकूण २१ विद्यार्थी सहभागी झाले.

ड. विद्यार्थ्यांना सुप्त गुणांना वाव देण्यासाठी दि.१८/०२/२०२० रोजी बी.ए.भाग—३ व एम.ए.भाग—१ च्या विद्यार्थ्यांकरीता चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. यामध्ये एकूण २२ विद्यार्थी सहभागी झाले.

४) **अभ्यास दौऱ्यांचे आयोजनः—**

ऐतिहासिक व पर्यावरणविषयक अध्ययन आणि जनजागृती तसेच सामाजिक व सांस्कृतिक अध्ययनाच्या उद्‌देश्यपूर्तीकरीता दि. १८ व १९ जानेवारी २०२० रोजी विभागप्रमुख डॉ.दिनकर उंबरकर यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रा.दिलीप दामु कुमरे यांच्या आयोजनात वेरुळ, दौलताबाद व औरंगाबाद येथे शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले. या अभ्यास दौऱ्यात विद्यार्थ्यांनी विविध सामाजिक, ऐतिहासिक, पर्यावरणविषयक माहितीचे प्रत्यक्ष संकलन करुन आपला अहवाल सादर केला.

दि.२८/०१/२०२० रोजी वृध्दांच्या समस्या जाणून घेण्यासाठी प्रा.डॉ.सुनिल प्रल्हाद गायगोळ यांच्या आयोजनात मातोश्री वृध्दाश्रम, खडकी अकोला या ठिकाणी पदवी व पदव्युत्तर विभागातील विद्यार्थी व प्राध्यापकांनी भेट दिली. या भेटी दरम्यान वृध्दांचे वास्तविक जीवन आणि त्यांच्या विविध समस्यांचा अभ्यास प्रत्यक्ष विद्यार्थ्यांनी करुन घेतला.

५)  **गुणवंत विद्यार्थी व गुणवत्ता यादी :—**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने उन्हाळी २०१९ च्या प्रसिध्द केलेल्या गुणवत्ता यादीत पदव्युत्तर समाजशास्त्र विभागातील विद्यार्थीनी कु.पल्लवी गोविंदराव टिकार यांनी प्रथम स्थान प्राप्त केले. विद्यापीठात प्रथम स्थान प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्याला दिला जाणारा वेदान्ततिर्थ स्व.रामचंद्र मुरकुटे स्मृतीप्रित्यर्थ सुवर्णपदक हे विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात या विद्यार्थीनीला प्रदान करण्यात आले.

विभागातील माजी विद्यार्थी श्री.गणेश रामकृष्ण मानकर यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे अंतर्गत घेतल्या जाणारी सेट (राज्य शैक्षणिक पात्रता परीक्षा), जून २०१९ समाजशास्त्र विषयात उत्तीर्ण केली.

६)  **संशोधन क्षेत्रातील योगदान :—**

विभागप्रमुख डॉ.दिनकर उंबरकर यांचे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या बी. ए.भाग—१ समाजशास्त्र विषयाच्या अभ्यासक्रमानुसार ‘समाजशास्त्र’ या नावाचे पुस्तक प्रकाशित झाले.

डॉ. दिनकर उंबरकर यांच्या मार्गदर्शनात संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठांतर्गत दोन विद्यार्थ्यांना आचार्य पदवी प्राप्त झाली तसेच जेजेटी विद्यापीठ, राजस्थान अंतर्गत समाजशास्त्र विषयात दोन विद्यार्थ्यांनी आचार्य पदवी प्राप्त केली.

या सत्रात डॉ. दिनकर उंबरकर यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये ०५ शोध निबंध प्रकाशित केले.

विभागातील डॉ. सुनिल गायगोळ यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये ०४ शोधनिबंध प्रकाशित झाले.

विभागातील प्रा. दिलीप दामु कुमरे यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जर्नल्मसध्ये ०३ शोधनिबंध प्रकाशित केले.

६)  **प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची सुरुवात :—** विभागा अंतर्गत या सत्रात ‘व्यावहारिक समाजशास्त्र’ या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची सुरुवात करण्यात आली. या अभ्यासक्रमाला एकुण २५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. या अभ्यासक्रमाचा भाग म्हणून ‘वृध्दाश्रमाचे सामाजिक दृष्टिकोनातुन अध्ययन’ या विषयावर एक शोध प्रकल्प पूर्ण करण्यात आला.

## सत्र : २०२०—२०२१

**१) गुणवत्ता यादी व गुणवंत विद्यार्थी :—**

दरवर्षी प्रमाणे याही सत्रात समाजशास्त्र विभागातील कु. सुष्मा निळकंठ डोंगर तसेच कु. नुतन प्रभुदास थोरात यांनी सं.गा.बा. अमरावती विद्यापीठाच्या एम. ए. समाजशास्त्र उन्हाळी २०१९ च्या वार्षिक परिक्षेत विद्यापीठातून समाजशास्त्र विषयाच्या गुणवत्ता यादीत अनुक्रमे तिसरे व नववे स्थान प्राप्त केले.

**२) संशोधन क्षेत्रातील योगदान :—**

या सत्रात महाविद्यालयात आचार्य पदवीकरिता सुरु असलेल्या संशोधन केंद्रात विभाग प्रमुख डॉ. दिनकर उंबरकर व डॉ. सुनिल प्रल्हाद गायगोळ यांच्या मार्गदर्शनात अनुक्रमे सहा व दोन विद्यार्थ्यांना आचार्य पदवीकरिता संशोधन करण्यासाठी सं. गा. बा. अमरावती विद्यापीठाने मान्यता प्रदान केली.

विभागप्रमुख डॉ. दिनकर उंबरकर यांचे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या बी. ए. भाग—३ समाजशास्त्र विषयाच्या अभ्यासक्रमानुसार 'सामाजिक मानवशास्त्र' या नावाचे पुस्तक प्रकाशित झाले. तसेच त्यांचे आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये ०४ व राष्ट्रीय जर्नल्समध्ये ०१ शोध निबंध प्रकाशित झाले.

विभागातील डॉ. सुनिल प्रल्हाद गायगोळ यांना यु.जी.सी. व्दारा पुरस्कृत 'आदिवासींच्या मानवाधिकाराचे समाजशास्त्रीय अध्ययन' या विषयावरील लघु शोध प्रकल्प (MRP) पूर्ण केला. तसेच त्यांनी आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये ०४ शोध निबंध व ०२ राष्ट्रीय चर्चासत्रा मध्ये शोध पेपरचे वाचन केले.

विभागातील प्रा. दिलीप कुमरे यांनी ०४ आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये शोध निबंध प्रकाशित केले व समाजशास्त्र विषयाच्या ०१ कार्यशाळेमध्ये सहभाग नोंदविला.

**३) प्रमाणपत्र अभ्यासक्रमाअंतर्गत प्रकल्प :—** या सत्रात कोरानाच्या प्रादुर्भावामुळे या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचा आवश्यक भाग म्हणून वर्णनात्मक पध्दतीने विद्यार्थ्यांनी घरी राहुनच 'आदिवासींच्या शैक्षणिक व आरोग्यविषयक समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन' हा शोध प्रकल्प पूर्ण केला.

४)    **चर्चासत्राचे आयोजन :—**

दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी, अकोला द्वारा संचालित संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोलाचे समाजशास्त्र विभाग, निरंतर शिक्षण व विस्तार विभाग संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती तथा श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय, खडकी अकोला यांचे संयुक्त विद्यमाने ''भारतीय आदिवासी: काल, आज आणि उद्या'' या संकल्पनेवर आधारित ऑनलाईन राष्ट्रीय चर्चासत्राचे दि.३०/०८/२०२१ रोजी आयोजन करण्यात आले. या चर्चासत्रामध्ये संपूर्ण भारतामधून १०४ प्रतिनिधींनी सहभाग नोंदविला.